सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,भंडारा,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

दुरध्वनी क्र.01784-251222
E-Mail- ddmobnd@gmail.com

**वाचा :** १ आपत्ती व्यवस्थापनकायदा, २००५ चे कलम३०, ३३, ३४,४१ व कलम ५१
२. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना२०२०/प्रा.क्र.५८/ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०
३. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. मुख्य सचिव यांचे दुरचित्रवाणी परिषदेत दिलेले निर्देश दि.१६ मार्च २०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**
**क्र.कक्ष/जिकाभं/जि.आ.व्य.अ./ ३५० /२०२०**
**दिनांक :- २३ /०३/२०२०**

**आदेश**

राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वातंत्र्यरित्या निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर्भ क्र. ०२ मधील परिच्छेद ०३ नुसार कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणने व प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

सदर कायदा भंडारा जिल्ह्यात लागु करण्यात येत असुन करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून भंडारा जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम 30 (2) (v) व (xviii) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन **जिल्ह्यातील सर्व काळी पिवळी टॅक्सी, ऑटो तथा सर्व खाजगी वाहने (कार, जिप, सुमो, ट्रॅवलर इ.) (सदर दरम्याण आत्यावश्यक सेवा, अधिकारी/ कर्मचारी, किराणामाल, भाजीपाला, दुध, औषधे व स्वास्थ सेवासंधी वाहने वगळुन) तात्काळ बंद करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे.** हे आदेश दिनांक २३/०३/२०२० रोजी पासुन रात्री ०८.०० वाजेपासुन अधिसूचना व नियमावली माधिल तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तरी या आदेशावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, व याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,भंडारा**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**

**प्रती** -१. सर्व विभाग प्रमुख ---------------------------------------- जिल्हा भंडारा
**प्रत**-१.मा. विभागीयआयुक्त, नागपुर विभाग नागपुर यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner